जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - २९२ दिनांक - १८/०७/२०२४

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

### जबरी चोरी करणा-या सराईतास कोंढवा तपास पथकाकडुन अटक

कोंढवा भागात राहणारे यातील फिर्यादी यांच्या दुकानातुन एक अनोळखी इसमाने गल्ल्यातील ३ हजार रुपये रोख रक्कम चोरी गेल्याबाबत कोंढवा पोलीस ठाणे पुणे येथे गुन्हा दाखल आहे.

सदर आरोपी यांचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक गुन्हे यांनी आदेशित केले होते. सदर आदेशाप्रमाणे सहा पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे व त्याचे तपास पथकातील स्टाफ असे पेट्रोलिंग करुन तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुला असणा-या सीसटिव्हि फुटेजच्या माध्यमातुन तसेच गुप्त बातमीदारामार्फतीने माहिती काढुन शोध घेत असताना दि.११/०७/२०२४ रोजी पोलीस अंमलदार विकास मरगळे, अक्षय शेंडगे_यांना त्याच्या बातमीदारामार्फतीने बातमी प्राप्त झाली की, सदर गुन्हा हा आरोपी नामे **कदिर उर्फ काजु आरिफ अन्सारी,वय २१ वर्षे,रा.भाग्योदयनगर ग.न.०२,बुशरा अर्पा. फलॅट नं.१३, कोंढवा खुा पुणे** याने केला असल्याची व त्याच्याकडे आणखीन काही चोरीचे मोबाईल असुन ते विकत घेण्यासाठी तो ग्राहक शोधत आहे, अशी माहिती मिळाली

सदर माहितीच्या अनुषंगाने आरोपी याच्या ठावठिकाण्याबाबत माहिती घेवुन त्याचा शोध घेतला असता तो अजमेरा पार्क येथील चहाच्या टपरीवर चहा व सिंगारेट पिण्यासाठी सायंकाळच्या सुमारास येत असतो अशी माहिती प्राप्त झाली. तेव्हा सदर ठिकाणी वरिल स्टाफच्या मदतीने सापळा रचुन थांबलो असता तो अजमेरा पार्क सोसायटीत आल्याचे दिसले. तेव्हा त्यास सोबतच्या स्टाफसह ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने वरिलप्रमाणे आपले नाव पत्ता सांगितले. त्यावेळी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिशात एकुण चार मोबाईल व पॅन्टच्या खिशात रोख रक्कम ३०००/- रु.मिळुन आली. त्यावेळी त्याच्याकडे सदर मोबाईलबाबत तसेच रोख रक्कमेबाबत तपास केला असता त्याने कोंढवा भागातील १)शिवनेरीनगर,शंगुनका हाईट्स, कोंढवा खुा पुणे, २)लेडी हलीमा शाळेच्या बाहेर कोंढवा खुा पुणे, ३)नवाजिश चौक, रुकसार हाइट्स हयात हॉटेल जवळ,कोंढवा खुा पुणे येथील उघडया दरवाजातुन घरातील लोकाची नजर चुकवून मोबाईल चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे तसेच रोख रक्कम ही स्टार सेल्स, नावाचे शॉप भाग्योदयनगर, येथुन चोरी केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपी यांच्या विरुध्द यापुर्वी ही तीन मारहाण केल्याचे गुन्हे दाखल असुन सदर आरोपी यांच्याकडुन १ जबरी चोरीचा व ३ मोबाईल चोरीचे गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परि.०५, श्री.आर राजा,मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग श्री.नंदकुमार गोडसे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती रुणाल मुल्ला व श्री. मानसिंग पाटील, यांच्या मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, पोलीस उप निरीक्षक बालाजी डिगोळे, पोलीस अंमलदार अमोल हिरवे, विकास मरगळे, अक्षय शेंडगे, अभिजीत रत्नपारखी, राहुल थोरात, सुहास मोरे, अभिजीत जाधव, गणेश चिंचकर, राहुल रासगे यांनी केली आहे.